# आदर्श जैवविविधता राज्य करण्याचा संकल्प

## मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत | साखळीत आंतरराष्ट्रीय जैवविविधता दिनी राज्य जैवविविधता पुरस्कार वितरण

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. २४ :** गोवा राज्य हे जैवविविधतेचा खजिना असलेले राज्य असून आज अनेक दुर्मिळ ठेवा नष्ट होताना दिसत आहे, त्याचे संवर्धन व पुनर्जीवन करण्यासाठी राज्यातील प्रत्येक घटकांचे सहकार्य महत्त्वाचे असून गोवा राज्य जागतिक पातळीवर जैवसंप दा राज्य करण्याचा आमचा निर्धार असून त्यासाठी लोकसहभागाची गरज आहे राज्यात सात ठिकाणी जैवविविधता केंद्र सुरू करण्यात आल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी साखळी येथे केली.

आंतरराष्ट्रीय जैवविविधता दिनानिमित्त साखळी येथे आयोजित कार्यक्रमास मुख्यमंत्री बोलत होते. दुर्मिळ वनस्पती जीवजंतू सांभाळणे गरजेचे आहे गोव्यातील विविध भागात असलेले पुरातन कडधान्य पालेभाजी कंदमुळे औषधी गुणधर्म असलेल्या वनस्पती या लोप पावत असल्याची भीती व्यक्त करताना त्याचे संवर्धन करण्यासाठी नव्या पिढीने विशेष योगदान देण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले सह्याद्री परिसर हा जैवसंपदेचा मुकुट आहे तो राखून ठेवण्यासाठी वेगवेगळ्या माध्यमातून अनेक मान्यवर काम करत आहेत. गोव्याच्या युवकांनीही त्यासाठी



साखळी : पुरस्काराने सन्मान करणाऱ्या मान्यवरांसोबत मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत व मान्यवर.

आपले योगदान देत असतानाच गोव्याच्या पारंपारिक जैविक संपदा राखून ठेवणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले

पारंपरिक शेती कुळा गरे, खाजन आदी अनेक जैविक संपदा आमच्या पिढ्यानपिढ्या राखून ठेवण्याचे काम केलेले आहे. कुळाग रात विविध पिके घेणे शक्य आहे निसर्गाशी समन्वय साधून तो टिकवणे गरजेचे असून नवयुवकांनी यासाठी विशेष योगदान द्यावे.

प्लास्टिक बंद करून पर्यावरण संवर्धनासाठी सर्वांनी कार्यरत राहावे. गोव्यात अभयारण्य पाहण्यासाठी लोक तसेच जैविक संपत्तीचा खजाना असलेल्या गोव्याला नवी ओळख करून देण्यासाठी जैवविविधता ठेवा सांभाळणे गरजेचे आहे. सारा गोवा हरित व्हावा यासाठी वेगवेगळ्या माध्यमातून सरकारचे प्रयत्न सुरू असून मायनिंगचे डंपही हरित करण्यावर प्रयत्न सुरू आहे असे मुख्यमंत्री म्हणाले. प्रत्येक तालुक्यात एका नव्या जैविक पदार्थाची ओळख व्हावी यासाठी ही आमचे प्रयत्न आहेत

राज्यातील मिठागरे नव्याने सुरु करण्याचा घोषणा मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली. तसेच गोव्यात ॲग्रो क्लिनिक जून पासून सुरू होणार असल्याची मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. भावी पिढीसाठी निसर्ग जपून ठेवणे गरजेचे असून जैवविविधतेच्या माध्यमातून निसर्गाचे संतुलन राखण्यासाठी प्रत्येक गोमंतकी यांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले यावेळी राज्यातील विविध क्षेत्रात जैवविविधता संवर्धनासाठी काम करणाऱ्या मान्यवरांना जैवविविधता पुरस्कार मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गौरवण्यात आले. रवींद्र भवन साखळी येथे आयोजित करण्यात आलेल्या या जागतिक जैवविविधता दिन कार्यक्रमात व्यासपीठावर डॉ श्रीधर ठाकूर, डॉ अर्चना गोडबोले सिद्धी प्रभू, लेवीन्सन मार्टिन्स, सचिन देसाई, जैवविविधता मंडळाचे सदस्य सचिव डॉ. प्रदीप सरमुकादम, संदीप फळ देसाई, विजयकुमार नाटेकर आदी उपस्थित होते. डॉ प्रदीप सर मोकदम यांनी स्वागत पर भाषणात साडेसहा लाख वृक्ष लागवड, स्वयंपूर्ण गोवा अंतर्गत विविध उपक्रम मिठाग्रह, जैविक विविधता नोंदणी तसेच जैवविविधता ॲक्शन प्लान तयार करणे आदी अनेक माध्यमातून काम सुरु असल्याचे सांगितले. सिद्धी प्रभू यांनी मार्गदर्शन केले.

डॉ गोड बोलें, डॉ. सिद्धार्थ ठाकूरयांनी जैव विविधता संदर्भात गोव्यात सुरु असलेल्या कामाबद्दल अभिनंदन केले. यावेळी विविध क्षेत्रातील जैव संरक्षणासाठी कार्य केलेल्या ना जैवविविधता पुरस्काराचे सन्मानित करण्यात आले. यावेळी गोव्याच्या जैविक संपत्तीचे दर्शन घडवणाऱ्या विशेष प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले त्याला मोठा प्रतिसाद लाभला होता. सचिन देसाई यांनी आभार मानले.

पान १ वरून

### मडगावमध्ये पुन्हा इमारतीचा भाग कोसळला

कामत यांनी अशा घटनांची जबाबदारी संपूर्णपणे शासनावर ढकलणाऱ्या टीकाकारांवर निशाणा साधला. या जुन्या खाजगी इमारतींच्या देखभालीची जबाबदारी त्यांच्या मालकांचीच आहे. नियमित देखभाल केल्यास अशा घटना टाळता येऊ शकतात, असे ते म्हणाले.तसेच, त्यांनी स्पष्ट केले की, मडगाव नगरपरिषद किंवा आमदाराला दोषी ठरवणे योग्य नाही, कारण अशा इमारतींविरुद्ध कारवाई करण्याची एक कायदेशीर प्रक्रिया असते. अनेक वेळा मालक किंवा भाडेकरू न्यायालयात दाद मागतात, ज्यामुळे कारवाई अडथळ्यात येते.

कामत यांनी असुरक्षित इमारतींविषयी आधीच सर्वेक्षण झाले असल्याचे सांगून, लवकरच मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून संपूर्ण गोवा पातळीवर एकसंध धोरण तयार करण्याची गरज व्यक्त केली. धोकादायक इमारतींवर कारवाई करताना कोण जबाबदार असेल, कायदेशीर प्रक्रिया कशी पार पडेल आणि पाडकामाची अंमलबजावणी कोण करणार, यासंदर्भात स्पष्टता आवश्यक आहे, असे ते म्हणाले.

### रॅगिंग प्रकरणात निष्पक्ष चौकशीची मागणी

विद्यार्थ्यांकडून त्यांच्या तक्रारीचा पाठपुरावा करण्यात रस नाही, असे लेखी स्वरूपात देण्यास सांगितले जात आहे. हा गंभीर प्रकार आहे, असे नाझरेथ म्हणाले.

तसेच, माहिती अधिकार कायद्यानुसार त्यांनी कॉलेज प्रशासनाकडे काही माहिती मागितली होती. मात्र, प्रशासनाने ते 'बाहेरील व्यक्ती' असल्याचे कारण देत आणि कायद्याच्या कलम ८ अंतर्गत माहिती नाकारली, असा आरोपही त्यांनी केला. मी आता कॉलेज प्राचार्यांच्या आदेशाला आव्हान देत राज्य माहिती आयोगात अपील दाखल केले आहे. हे प्रकरण १७ जून रोजी सुनावणीसाठी निश्चित करण्यात आले आहे. सत्य समोर यायला हवे, असे ठाम मत नाझरेथ यांनी व्यक्त केले.

# लाडक्या बहिणींसाठी पुन्हा आदिवासींच्या निधीवर डल्ला

**मुंबई, दि. २४ :**

महायुती सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेसाठी अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींचा हक्काचा निधी देण्यास तीव्र विरोध होत असताना या विरोधाला न जुमानता सरकारने आदिवासी विकास खात्याच्या निधीवर पुन्हा डल्ला मारला आहे. लाडक्या बहिणींसाठी ३३५ कोटी ७० लाख रुपयांचा निधी महिला आणि बालविकास खात्याकडे वळविण्यात आले आहेत. आदिवासी विकास विभागाने शुक्रवारी यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला. हा निधी लाडक्या बहिणींना मे महिन्याच्या हप्त्यापोटी दिला जाणार आहे.

गेल्या वर्षी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महायुती सरकारने पात्र महिलांना दर महिना १ हजार ५०० रुपये देणारी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' जाहीर केली. सरकारने निवडणुकीपूर्वी योजनेतील लाभार्थी महिलांना पाच महिन्याचे हप्ते दिले.

# शिर्डीत ज्ञानेश्वर माऊली वारकरी संप्रदाय मेणकुरेचे भजन



शिर्डी : साईबाबा मंदिरात भजन सादर करताना श्री ज्ञानेश्वर माऊली वारकरी संप्रदाय मेणकुरे भजनी कलाकार समवेत संप्रदायचे अध्यक्ष देवानंद नाईक.

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. २४ :** ज्ञानेश्वर माऊली वारकरी संप्रदायातर्फे श्री साईबाबा मंदिर – शिर्डी येथे सदाबहार भजनाचा कार्यक्रम मोठ्या दिमाखात झाला. या कार्यक्रमाचे शिर्डी देवस्थान विश्वस्थांनी व उपस्थित साई भक्तांनी भरभरून प्रतिसाद देत कौतुक केले.

श्री ज्ञानेश्वर माऊली वारकरी संप्रदाय मेणकुरेतर्फे संप्रदाय वारकरी माऊलींकडून साईबाबा मंदिर, शिर्डी येथे रविवार दि. ११ रोजी सायंकाळी सदाबहार गोमंतकीय भजनाचा कार्यक्रम संपन्न झाला.या कार्यक्रमाचे शिर्डी देवस्थान विश्वस्तांनी व उपस्थित साई भक्तांनी भरभरून प्रतिसाद देत कौतुक केले.

या कार्यक्रमासाठी वारकरी संप्रदाय – मेणकुरेचे अध्यक्ष देवानंद नाईक यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. या भजन कार्यक्रमात संप्रदाय वारकरी माऊलीं गायक कलाकार – गुरुदास नाईक (कवळे –फोंडा), पांडुरंग परब (मेणकुरे), धोंडु मुळगावकर (मुळगाव), दादु नाईक (मये), महेश शिरगांवकर (शिरगाव), गोपाळ साळगांवकर (कोलवाळ), बाबनी शेटकर (शिरोली) तसेच हार्मोनियम वादक – सिताराम कवठणकर (कोलवाळ), तबलावादक – योगेश राणे (उगाडे – दोडामार्ग), पखवाजवादक – पैल्लज शेट्ये (नादोडा) यांची संगीत साथ आणि साथी कलाकार म्हणून अमित शंकर नाईक, सदाशिव नाईक (मेणकुरे), नंदकुमार शेट्ये (पर्ये), नकुळ नाईक (मेणकुरे) व शंभु गावस (आगशी), गौरव शंभू गांवस – (सुलभात आगशी ),मयुरेश राजेंद्र नाईक – दिवाडे ,साईरूप सदाशिव नाईक – (मेणकुरे), संदेश धुरी – (भेडशी), नंदकीशोर नाईक– (साळ) आदी सहभागी झाले होते.

गोव्यातील प्रसिद्ध भजनी आगळ्यावेगळ्या भजन चालींमध्ये भजन सादर केले याला साईबाबा मंदिर, शिर्डी येथील विश्वस्त, उपस्थित साईभक्त यांनी भरभरून दाद देत वाहवा मिळविली. भजन कार्यक्रम झाल्यानंतर साईबाबा मंदीर देवस्थान शिर्डी यांच्याकडून वारकरी संप्रदाय – मेणकुरेचे अध्यक्ष देवानंद नाईक यांच्यासह सर्व सहभागी कलाकारांचा विश्वस्त राजेंद्र पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत यथोचित सन्मान करण्यात आला.

NEW GOA EDUCATIONAL TRUST'S
G. S. AMONKAR VIDYA MANDIR
MAPUSA GOA
NG / GEN / 18 / 2025 / 958
TENDER NOTICE
Sealed Quotations are invited for the supply of School Stationery and for printing of School Calender (Prospectus, Diary and Hand book) for Secondary and Primary section. Interested parties may collect the requirement list, from the school office.
The sealed quotation should reach this office on or before 31/05/2025 by 1.00 p. m. Quotations received after the due date will not be entertained.
May 24, 2025, Mhapsa
Sd/- HEADMISTRESS

CHANGE OF NAME
I, Saeesha Saeesh Naik, residing at H.No 871/B, Ramtalem, Aldona, Bardez, North Goa, Goa, 403508, have changed my name from Anita Mangaldas Naik to Saeesha Saeesh Naik. Hereafter, in all my dealings and documents, I will be known by the name Saeesha Saeesh Naik.
Sd/- Saeesha S. Naik




पणजीत स्मार्ट सिटीच्या निकृष्ट कामाची पोलखोल मान्सूनपूर्व पावसाने केली आहे.

# छगन भुजबळांची मंत्रिमंडळात एन्ट्री

**बीड, दि. २४ :**

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी आज मंत्रिपदाची शपथ घेतली. त्यामुळे त्यांचं पुन्हा एकदा राजकीय पुनर्वसन झालं आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिल्यानंतर मंत्रिमंडळातील एक जागा रिक्त झाली होती. या जागेवर आता छगन भुजबळ यांची वर्णी लागली आहे. राज्यात महायुतीचं सरकार आले तेव्हा छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळातून डावलण्यात आले होते. त्यामुळे भुजबळ नाराज होते. पण मुंडेंच्या राजीनाम्यानंतर आता भुजबळांना मंत्रिमंडळात स्थान देण्यात आलं आहे. त्यामुळे आता त्यांची नाराजीदेखील दूर झाली असेल. दुसरीकडे आता भुजबळांच्या मंत्रिमंडळातील एन्ट्रीनंतर धनंजय मुंडे यांच्या भवितव्याबाबत प्रश्न उपस्थति



केले जात आहेत. मुंडे यांची आता पुढच्या पाच वर्षात मंत्रिमंडळात एन्ट्री होणं कठीण असल्याची चर्चा आहे.

बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे धनंजय मुंडे यांची प्रतिमा मलिन झाली आहे. या प्रकरणातील फोटो समोर आल्यानंतर धनंजय मुंडे यांना राजीनामा द्यावा लागला होता. संबंधित फोटोंमध्ये आरोपींनी संतोष देशमुख यांची किती अमानुषपणे हत्या केली ते स्पष्ट दिसत होतं. संबंधित फोटो समोर आल्यानंतर दुसऱ्याच दिवशी सकाळी धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिला होता. या प्रकरणात अनेकदा धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली होती. पण मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला नव्हता.

विशेष म्हणजे धनंजय मुंडे यांच्या पक्षाचे प्रमुख अजित पवार यांनी आपले उदाहरण देत अप्रत्यक्षपणे धनंजय मुंडे यांना राजीनामा देण्याचा इशारा दिला होता. आपल्यावर आरोप झाले तेव्हा आपण नैतिकतेच्या आधारावर राजीनामा दिला होता, असे अजित पवार म्हणाले होते. तरीसुद्धा धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिला नव्हता. अखेर संतोष देशमुख हत्या प्रकरणाचे भीषण फोटो समोर आल्यानंतर धनंजय मुंडे यांना राजीनामा द्यावा लागला.

# सागर कला मंथन अंतर्गत पाडील मार स्पर्धा उत्साहात




तळपण : नदीच्या काठावर पाडी समाज संघटनेतर्फे आयोजित पागीर मार स्पर्धेचे उद्घाटन करताना सभापती रमेश तवडकर व संघटनेचे पदाधिकारी.

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. २४ :** अखिल गोवा क्षत्रिय पागी समाज संघटना सरकार दरबारी नोंद झाल्यास ४० वर्षे होत असल्यामुळे समाज संघटनेतर्फे सागर कला मंथन अंतर्गत दि. २३ मे व दि. २४ मे पर्यंत विविध उपक्रमाचे याठिकाणी आयोजन केले आहे.आज शुक्रवार दि. २३ मे रोजी पाडील मार नुसते काड या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

तळपण नदीच्या खाडीत घेतलेल्या या स्पर्धेचे उद्घाटन स्थानिक आमदार व सभापती रमेश तवडकर यांनी पागीर मारून केले. यावेळी समाज संघटनेचे अध्यक्ष दिवाकर पागी, सचिव रुद्रेश नमशीकर, खजिनदार समीर काणकोणकर, सभासद व माजी नगराध्यक्ष रत्नाकर धुरी, चंदन धुरी, दिपेश पागी व अन्य उपस्थित होते.

आज रोजी आयोजित पागीर मार स्पर्धेत एकूण ४२ स्पर्धकांनी भाग घेतला होता. त्यांनी पागीर मारून शेवटे, काळूदर, सील, कोअर सारखे विविध प्रकारचे मासे पकडले.

यावेळी सभापती श्री तवडकर यांनी पाडी समाज संघटनेतर्फे आयोजित या अनोख्या पद्धतीने घेतलेल्या या स्पर्धेचे कौतुक करून समाज संघटनेचे अध्यक्ष दिवाकर पागी व अन्य पदाधिकारी यांचे अभिनंदन केले.

SBI
स्टेट बँक ऑफ इंडिया, होम लोन सेंटर कोड 64122 पहिला मजला,
एसबीआय मडगाव मुख्य शाखा, नगरपालिका उद्यानाजवळ, मडगाव, गोवा 403601.
दूर.क्र. 0832 2732567 ईमेल : sb.64122@sbi.co.in

परिशिष्ट–4 ए (नियम 8(6) च्या तरतुदी पहा) स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना

**सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 सह सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, 2002 च्या नियम 8(6) मधील तरतुदींखाली स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी ई–लिलाव विक्री सूचना**

याद्वारे तमाम लोक आणि खासकरून कर्जदार व हमीदार यांना नोटीस देण्यात येते की, स्टेट बँक ऑफ इंडिया (सुरक्षित धनको) कडे गहाण टाकलेल्या व त्यांचा भार असलेल्या खाली वर्णिलेल्या जंगम व स्थावर मालमत्ता ज्यांचा **रचनात्मक / भौतिक ताबा** स्टेट बँक ऑफ इंडियाच्या, (सुरक्षित धनको) प्राधिकृत अधिकारी यांनी घेतला असून त्या खाली दिलेले कर्जदार व हमीदार यांचेकडून **स्टेट बँक ऑफ इंडियाला** देय असलेल्या म्हणजे **रु. 27,50,654/-** अधिक त्यावरील न आकारलेले व्याज व लागू खर्चासहितच्या रकमेच्या वसुलीसाठी **जसे आहे जेथे आहे, जे आहे जे काही आहे, व तेथे जे जे काही आहे** या तत्वावर **20-06-2025** रोजी विकल्या जातील. सुरक्षित मत्तांसमोर राखीव किंमत व बयाणा रक्कम ठेव (ईएमडी) दिली आहे. ई–लिलावाच्या अटी व शर्ती **BAANKNET (URL:https://baanknet.com)** या ई–ऑक्शन पोर्टलवर उपलब्ध आहेत. सदर विक्री येथे खाली दिलेल्या ई–ऑक्शन प्लॅटफॉर्मद्वारे खाली सही करणाऱ्याद्वारे केली जाईल. **मालमत्तेची पाहणी करण्याची तारीख/वेळ आणि पाहणीसाठी संपर्क क्रमांक : संबंधित शाखेत 20-06-2025 रोजी दुपारी 1.00 ते संध्या. 5.00, दूर.क्र. : 880660098 (स्टेट बँक ऑफ इंडिया, केपे शाखा)**

ई–लिलाव तारीख व वेळ : ई–लिलाव तारीख : 26/06/2025
वेळ : सकाळी 10३0 ते संध्या. 4.30. 10 मिनिटांच्या स्वयंचलित विस्तारासह.

| कर्जदार–खाते नाव आणि मालकी करार धारक | मालमत्ता तपशील (फ्लॅट गाळे जमीन बिल्डींग इ.) | 13(2) तारखेस देय रक्कम | राखीव किंमत ईएमडी रक्कम बोली वाढ रक्कम |
|---|---|---|---|
| श्री. संजीव कुमार आणि श्रीमती शीला राणी | केपे, दक्षिण गोवा, गोवा 403705 येथील शिरवई गावात पीस व्हॅली बिल्डींगच्या ब्लॉक डी मधील दुसऱ्या मजल्यावरील निवासी स्टुडिओ फ्लॅट क्र. डीएस–एसडी–04 | 03/09/2019 दि. 03/09/2019 रोजी रु. 14,93,835/-अधिक 04/09/2019 पासून साठलेले व्याज. | रा.किं. : रु. 17,10,000/- ईएमडी : रु. 1,71,000/- बो.वा.र. : रु. 0.10 लाख |

टीप : 1. ईएमडी व केवायसी सादर करण्याची अंतिम तारीख 23.06.2025 राहील (संकेतस्थळाच्या उपलब्धतेवर लागू). 2. बोलीची 25% रक्कम 1 (एक) दिवसात भरावी व उर्वरित रक्कम यशस्वी बोलीनंतर 15 (पंधरा) दिवसांच्या आत जमा करावी अन्यथा ईएमडी रक्कम जप्त केली जाईल. जर अपेक्षित वा स्वीकृत किंमत न मिळाल्यास प्रस्ताव रद्द करण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवला आहे. 3. एकदा लावलेली बोली रद्द करता वा मागे घेता येणार नाही. रजिस्टर्ड युजर आयडी कडून लावलेल्या सर्व बोली फक्त त्यानेच लावल्या आहेत असे गृहित धरले जाईल. 4. विक्रीच्या अटी व शर्ती बोलीदाराने वाचल्या व त्या त्यास समजल्या आहेत, असे गृहित धरले जाईल. 5. बोलीदार त्यांच्या आवडीच्या जागेवरून बोलीसाठी ई–लिलावात भाग घेऊ शकतील / इंटरनेट कनेक्टिव्हिटी, नेटवर्क समस्या, सिस्टीम क्रॅशडाऊन, वीज जाणे इ. 6. त्यासाठी कोणतेही कारण न देता प्रस्ताव स्वीकारणे/फेटाळणे/रद्द करणे /पुढे ढकलण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवला आहे.

दिनांक : 24/05/2025 ठिकाण : मडगाव
प्राधिकृत अधिकारी
स्टेट बँक ऑफ इंडिया

# 'एकविरा देवी' नाटकाचे यशस्वी सादरीकरण


### दयानंद वेंगुर्लेकर यांचा कोरगाव नाभिक समाजातर्फे सत्कार

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २४ :** पेठेचावाडा, कोरगाव येथील नाभिक समाजाच्या वतीने मराठी शिक्षक, लेखक व नाट्यदिग्दर्शक दयानंद हरिश्चंद्र वेंगुर्लेकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्यांनी सादर केलेल्या 'एकविरा देवी' या पौराणिक दशावतारी नाटकाने प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान मिळवले असून, सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरेचा प्रभावी जागर घडवून आणला.

स्नेहसंमेलनात मांढरगडची मांढरादेवी काळुबाई' या नाटकाला मिळालेल्या उदंड प्रतिसादानंतर, नाभिक समाजाच्या आग्रहास्तव सत्यनारायण पूजनानिमित्त 'एकविरा देवी' नाटकाचे आयोजन करण्यात आले. नाटकाचे दिग्दर्शन श्री. वेंगुर्लेकर यांनीच केले होते.

पांडुरंग कोरगावकर म्हणाले की,



कोरगाव : नाभिक समाजाच्या वतीने दयानंद वेंगुर्लेकर यांचा सत्कार करताना प्रकाश (झिलू) शेट्ये. सोबत पांडुरंग कोरगावकर, प्रकाश (झिलू) शेट्ये, प्रदीप कोरगावकर व इतर.

कला हा माणसाचा अमूल्य वारसा व नैसर्गिक देणगी असते आणि प्रत्येकाने आपली कला जोपासणे आवश्यक असते. कला ही माणसाच्या जीवनाची ओळख असते, ती जोपासणे प्रत्येकाच्या हातात आहे. दयानंद वेंगुर्लेकर यांनी आपल्या कलेच्या माध्यमातून सांस्कृतिक परंपरा जपली असून, त्यांच्या पुढील प्रवासाला यश लाभो, अशी आमची प्रार्थना आहे. त्यांच्या कलेने अनेकांना नव्याने जोडले.

या प्रसंगी पांडुरंग कोरगावकर यांनी दयानंद वेंगुर्लेकर यांना नवीन साहित्यनिर्मिती साठी शुभेच्छा देत प्रोत्साहन दिले. त्यांच्या हातून अजून चांगले साहित्य घडावे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

एकविरा देवी या नाटकाच्या दुसऱ्या प्रयोगावेळी कलाकारांच्या विनंतीवरून वेंगुर्लेकर यांनी देवी पार्वती आणि एकविरा या भूमिकाही यशस्वीरित्या साकारल्या. नाटकाच्या सादरीकरणावेळी श्री कमळेश्वर देवस्थानचे अध्यक्ष प्रकाश (झिलू) शेट्ये यांच्या हस्ते वेंगुर्लेकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पांडुरंग कोरगावकर व प्रदीप कोरगावकर आदी उपस्थित होते.

मांढरगडची मांढरादेवी काळुबाई हे नाटक युट्यूबवर अपलोड केल्यानंतर मोठा प्रतिसाद मिळाला. त्यानंतर महाराष्ट्रातील रेडी गावात शिवरात्रोत्सवात, तसेच कोरगाव, मांद्रे, तुये येथे ९ ते १० पात्रांसह प्रयोग सादर करण्यात आले. नाटकात इयत्ता सहावी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या नाटकातील सर्व स्त्री भूमिका मुलांनी उत्तम प्रकारे साकारल्या. बालकलाकारांच्या या उत्तुंग अभिनयाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

'दशावताराचे दर्शन' या इयत्ता नववीच्या पाठाला केंद्रस्थानी ठेवून या नाटकाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये नाट्यकलेची आवड निर्माण करणे, तसेच लोप पावत चाललेली दशावतारी परंपरा जपण्याचा उद्देश साधण्यात आला. स्नेहसंमेलना व्यतिरिक्त या नाटकाचे पाच प्रयोग यशस्वीरित्या सादर झाले असून, कोकणातील ग्रामीण भागांमध्ये त्यास उत्तम प्रतिसाद मिळत आहे.